# स्वतंत्रतावाद भारतीय लोकशाहीची गरज!

जगातील सर्वात मोठी लोकशाही असण्याचा सार्थ अभिमान बाळगण्यात काहीच गैर नाही, पण तेवढंच पुरेसं नाही हेही लक्षात घ्यायला हवं:

- स्वातंत्र्याची ६२ वर्षे पुर्ण होऊनदेखील आपला देश पृथ्वीवरील एक गरीब आणि भ्रष्टाचाराने जर्जर देश म्हणून ओळखला जातो हे दुर्दैव.
- लहान मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण भारतामधे सर्वात जास्त आहे. बाल मृत्यूचे प्रमाणसुद्धा चिंताजनक आहे. स्त्री-भ्रूण हत्येच प्रमाणसुद्धा भारतातच जास्त आहे.
- गरीबांसाठीच्या अनेक कल्याणकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहचतचं नाहीत.
- ह्या देशाच्या अन्नदात्याला आत्महत्या करावी लागते हेही आपलचं दुर्दैव.
- जर आपल्याला कोणी फसवलं अथवा मारहाण केली तर नसती आफत ओढावण्याच्या भितीपोटी आपण पोलिसांकडे जायला घाबरतो.
- कायदासुद्धा तसाच निष्क्रीय, अकार्यक्षम आणि सामान्यांनाच छळणारा आहे.
- राज्यघटनेप्रमाणे प्रांत, धर्म, पंथ वा जात यांच्या विरहीत सगळ्याच नागरिकांना समान अधिकार (स्वातंत्र्य) मिळत नाहीत.
- नक्षलवादाच्या भयावह परिस्थीतीमुळे भारताच्या २० राज्यांसमोर कधी नाही असे अंतर्गत सुरक्षेचे प्रश्न उभे ठाकले आहेत.
- अशा परिस्थीतीत सतत फोफावत चाललेला जातियवाद, दहशतवाद आणि प्रांतावादाविषयी आणखी न बोललेलचं बरं.

आपल्या राजकीय प्रतिनिधींनी कोट्यावधी भारतीयांच्या स्वप्नांचा चुराडा केलाय. काळजीने काम करणाऱ्या आणि कार्यक्षम नेत्यांऐवजी आपल्याला गुन्हेगारी प्रवृत्तीची आणि माजी नेत्यांची अकार्यक्षम मुलं पुढारी म्हणुन मिळतात. हे सगळं पाहिल्यावर वाटतं कि काहीतरी घोटाळा आहे.

## भारतीय समाजवाद, एक खोल जखम:

जेव्हा नागरिक त्यांच स्वातंत्र्य आणि अधिकार वापरतील तेव्हाच लोकशाही चालेल व टिकेल. स्वतंत्र भारताच्या प्राप्तीनंतर आपण आपले नेते तर निवडू शकलो पण दुर्भाग्याने संपत्ती कमवण्याचा आणि मालमत्तेचा मालकी हक्क आपल्याला नाकारण्यात आला. चांगल्या विचारांनी प्ररित, पण मार्ग चुकलेल्या नेहरूंनी सोव्हियत रशियाच्या 'शासन केंद्रित कार्यप्रणाली' पद्धतीने सरकार आणि प्रशासनाची स्थापना केली. तसेच 'परवाना राज प्रणाली' पद्धतीने खाजगी व्यवसायांची गळचेपी केली. प्रशासकीय अधिकारी वर्गाच्या हातात अमाप सत्ता गेली आणि मग लहानात लहान काम करून घेण्यासाठी देखील सरकारी कर्मचाऱ्यांच्या कृपाशिर्वादाची गरज पडू लागली.

ह्यामुळेच तब्बल सहा दशकं भारताची आणि पर्यायाने भारतीयांची परिस्थीती सगळं असुनही मागास आणि गरिब अशीच राहिली. नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणानुसार भारतीय प्रशासन आशिया खंडातील एक अति अकार्यक्षम आणि भ्रष्ट असल्याचे आढळून आले. फसवेगिरी आणि भ्रष्टाचार आता आपल्या दैनंदिन जिवनाचे व नागरी जानिवेचे अविभाज्य घटक बनले आहेत. नैतिकता सुद्धा आता भ्रष्ट झाली आहे.

अगदी १९९१ सालापर्यंत नोकऱ्यांच्या निर्मितीसाठी हे समाजवादी शासन एक प्रमुख स्त्रोत होते. आणि ह्याच कारणास्तव मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी वाढली. अर्थातच त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण कमी होण्याऐवजी आहे तेवढेच राहिलं किंबहुना वाढलं म्हंटल तर वावगं ठरणार नाही. ह्या समाजवाद्यांच्या भ्रष्ट आणि अकार्यक्षम कल्याणकारी योजनांनी भारताला आणखीच गरीब तर बनवलंच पण त्यापायी कितीतरी अमुल्य आणि अतुलनीय अशी राष्ट्रीय संपत्ती वाया घालवली.

आधारशिला ही एक भारतीय स्वतंत्रता संघ संघटनेची शाखा आहे.

संपर्क: संदीप नारायण शेळके, पुणे. (+९१ ९०१९८२८२८), sandeepnshelke@gmail.com

# स्वतंत्रतावाद भारतीय लोकशाहीची गरज!

## स्वतंत्रतावादः सुबत्तेचा हमखास मार्ग

दारिद्र्य, भ्रष्टाचार, आणि बेरोजगारी (ब-याच वाईट गोष्टीमधिल काही गोष्टी) ह्यांच जर उच्चाटन करायचं असेल तर भारतीय नागरिकांच्या आयुष्यातील प्रशासनाची लुडबुड कमी करावी लागेल. आणि तोच खरा स्वतंत्रतावादाचा मुलमंत्र म्हणजेच, स्वावलंबत्व. प्रशासन व सरकार नागरिकांच ऐकणारं असावं म्हणजेच नोकर, चाकर आपले मालक नव्हे.

दुर्दैवाने, स्वतंत्रतावादाविषयी भारतीयामधे खुप गैरसमज आहेत. असं म्हंटल जातं कि स्वतंत्रतावाद म्हणजेच भांडवलवाद-समाजवाद ह्यांच मिश्रण. पण, ते खरं नाही, साफ साफ ह्या समाजवाद्यांनी पसरवलेली खोटी अफवा. खरं तर स्वतंत्रतावाद म्हणजे एक तत्वप्रणाली आहे ज्यामधे व्यक्तीगत सार्वभौमत्व आणि कर्तव्य ह्यासाठी मोकळ्या मनाने तर्क-वितर्क करणे आणि वेगवेगळ्या विचारांचा आदर राखने (कमीत कमी सहनशिलता दाखवणे) अपेक्षित आहे. ह्याच योग्य अशा आर्थिक, सामाजिक व आध्यात्मिक कृतीने आपण सुख, समाधान आणि आनंदाची प्राप्ती करून घेऊ शकतो.

एक स्वातंत्र्यतावादी कधीच पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करत नाही, तर जबाबदार वर्तनच अपेक्षीत असते. खरं तर जेव्हा कधी सुख व समाधान मिळवताना आपण दुसऱ्याच्या हेतुला धक्का पोहचवतो तेव्हा तेव्हा प्रशासनाने मध्यस्थी करून शांततेत तिढा सोडवायला पाहिजे. तिढा सुटल्यावर प्रशासनाने जास्त लुडबुड न करता बाजुला होऊन काळजीपुर्वक सर्वांच्याच् स्वातंत्र्याचे रक्षण करावे.

स्वतंत्रतावाद मुक्त बाजार, मुक्त व्यापार आणि मुक्त व्यवसाय यांच्या माध्यमातुन सामाजिक, आर्थिक भरभराटीला चालना देतो. पण त्याबरोबरच् प्रत्येकाकडून आपपल्या कृतीच्या जबाबदारी अपेक्षीत असते.

जरी अद्ययावत स्वातंत्र्याच्या चळवळीला १७ व्या शतकात सुरूवात झाली असली तरी मुक्त विचाराला खुप जुना इतिहास आहे. खरं तर शांततापुर्ण चर्चा आणि प्रश्न उपस्थीत करणे हा नेहमीच् भारतीय समाज परंपरेचा भाग होता, हे विसरून चालणार नाही. उपनिषिधं आणि शास्त्रांमधुन तर मुक्त आणि निर्भय मन राखण्याला प्रोत्साहन दिले आहे. गौतम बुद्धांची शिकवण तर्क-वितर्कावरच् अवलंबुन होती, तसेच् त्यांच्या अनुयायांना देखील शंका निरसन झाल्याशिवाय कोणावरही विश्वास ठेवू नका असेच् शिकविले. १९व्या आणि २०व्या शतकातील भारताता श्री राजा राममोहन राय आणि श्री गोपाळ कृष्ण गोखले, तद्नंतर महात्मा गांधी यांनीदेखील स्वातंत्र्याचा पाठपुरावा केला. आणि त्यातुनच् स्वातंत्र्याच्या राष्ट्रवादी चळवळीची सुरूवात झाली. ह्याच् श्रेय जातं श्री गाधींना कारण त्यानी ही संकल्पना अमलात आणली. गाधीजींच्या मते "हिंदवी स्वराज्य" म्हणजे फक्त परकियांपासुन स्वातंत्र्य असा मुळीच् नव्हता तर सर्व प्रकारच्या प्रभावांपासुन स्वातंत्र्य, ज्यामधे नागरीकांच्या व्यवहारामधे प्रशासनाची लुडबुड सुद्धा होतं.

त्यांची अशी ठाम धारणा होती की नुसतेच् अधिकार आपल्याला स्वातंत्र्य देऊ शकत नाही. त्याच्या जोडीला कर्तव्य आणि जबाबदारी धर्म सुद्धा असायलाच् हवा. गांधीजींची स्वातंत्र्याची संकल्पना पुर्णपणे भगवत गितेतुन प्रीत होती. पण दुर्दैवाने त्यांच हिंदवी स्वराज्याच् स्वप्न स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात पुर्णपणे (जानुन-बुजुन) विसरले गेले.

## भारतीय राजकारणाचे शुद्धकरणः

१९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतरही समाजवादाचे गडद मळभं अजुनही भारतीय राजकारणावर घोंगावत आहे. जर हा भारतीय राजकारणाला समाजवादाचा लागलेला रोग घालवायचा असेल तर स्वातंत्र्याचा मुलमंत्र देणारी एक राजकीय चळवळ उभारावी लागेल. जर अशी चळवळ उभी केली तर आणि तरच् भारतीय समाज भ्रष्टाचार, दारिद्र्यापासुन खऱ्या अर्थाने मुक्त होऊ शकतो. आपण अशा समाजाची

आधारशिला ही एक भारतीय स्वतंत्रता संघ संघटनेची शाखा आहे.

संपर्कः संदीप नारायण शेळके, पुणे. (+९१ ९०१९८२८२८), sandeepnshelke@gmail.com

# स्वतंत्रतावाद भारतीय लोकशाहीची गरज!

निर्मीती करू शकू जिथे प्रत्येक नागरीकाला समान संधी मिळेल तसेच प्रत्येकजन त्यांच्या कृतीसाठीही तेवढाच जबाबदार असेल.

जर हे स्वप्न सत्यात उतरवायचे असेल तर आपल्याला सर्वप्रथम आपली राजकीय कार्यप्रणाली साफ करावी लागेल. त्यासाठी स्वच्छ प्रतिमेचे, निशंक एकात्मता, तसेच सकारात्मक बदल घडविण्याची असिम इच्छाशक्ती, स्वतंत्रतावादी लकिशाहीचा हट्ट असणारं नेतृत्व निवडण्याची गरज आहे.

सद्यस्थीतीच्या पक्षिय–राजकारणातुन आपल्याला काहीच अपेक्षा नसतील, तर मग काय? कुठे जायचं? की जे चाललय ते बदलायचंय? नुसतचं बघत बसायचं नसेल तर.

## "भारतीय स्वतंत्रता संघ"

"भारतीय स्वतंत्रता संघ" (Freedom Team of India http://freedomteam.in/) एक अशी संघटना आहे ती अशा बदलाचा प्रस्ताव खात्रीने देत आहे. "भारतीय स्वतंत्रता संघ" एक असं व्यासपीठ आहे जिथं सक्रिय राजकारणात उतरण्यासाठी नेतृत्व घडवले जाते. आपल्या आपल्याला स्वतंत्र प्रजासत्ताक राष्ट्र ही आपल्या पुर्वजांनी १९४७ सली दिलेली अमुल्य भेट आहे. आता ही आपली जबाबदारी आहे की एक सर्व संपन्न आणि स्वतंत्रतावादी भारतीय लोकशाही घडविण्याची.



संपर्क: संदीप नारायण शेळके, पुणे. (+९१ ९०१९८२८२८), sandeepnshelke@gmail.com